# <u>परिपत्रक</u>

**विषय : सन २०१४-१५ साठी विविध केंद्र/ राज्य पुरस्कृत योजनांतर्गत पुरवठा करावयाच्या फॉस्फो जिप्समचे दर निश्चिती बाबत.**

**संदर्भ :** मा. कृषि संचालक (निवगुनि) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक : ०१ ऑगस्ट २०१४ रोजी आयोजित निविष्ठा विक्रीदर निश्चिती समितीची सभा.

सन २०१४-१५ करिता विविध केंद्र/ राज्य पुरस्कृत योजनांतर्गत पुरवठा करावयाच्या फॉस्फो जिप्समच्या विक्री दरास वरील संदर्भात नमूद केलेल्या मा. कृषि संचालक (निवगुनि) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. फॉस्फो जिप्समची खरेदी ही महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित (एमएआयडीसी), मुंबई यांचेकडून खालील दिलेल्या दरानुसार करावयाची आहे. सदरचे विक्री दर हे सर्व करासहित ५० किलोच्या एचडीपीई बॅग मध्ये पॅकिंग करुन वाहतुक करुन तालुकास्तरपर्यंत पोहच तत्वावर अंतीम करण्यात आलेले आहेत.

(दर रू. प्रति मे.टन)

| अ.क्र. | जिल्हा | सन २०१४-१५ करिता फॉस्फो जिप्समचे वाहतुक व सर्व करासहित मंजूर दर | | | अ.क्र. | जिल्हा | सन २०१४-१५ करिता फॉस्फो जिप्समचे वाहतुक व सर्व करासहित मंजूर दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळ किंमत | वाहतुक खर्च | एकूण किंमत | | | मुळ किंमत | वाहतुक खर्च | एकूण किंमत |
| १ | ठाणे | ९५० | १९४५ | २८९५ | १८ | लातूर | ९५० | २३६० | ३३१० |
| २ | रायगड | ९५० | २००० | २९५० | १९ | उस्मानाबाद | ९५० | २३६० | ३३१० |
| ३ | रत्नागिरी | ९५० | २५०० | ३४५० | २० | नांदेड | ९५० | २३६० | ३३१० |
| ४ | सिंधुदुर्ग | ९५० | २६०० | ३५५० | २१ | परभणी | ९५० | २३६० | ३३१० |
| ५ | नाशिक | ९५० | १५७३ | २५२३ | २२ | हिंगोली | ९५० | २३६० | ३३१० |
| ६ | धुळे | ९५० | १५७३ | २५२३ | २३ | बुलढाणा | ९५० | २२१३ | ३१६३ |
| ७ | नंदुरबार | ९५० | १५७३ | २५२३ | २४ | अकोला | ९५० | २२५५ | ३२०५ |
| ८ | जळगांव | ९५० | १७८३ | २७३३ | २५ | वाशिम | ९५० | २३६० | ३३१० |
| ९ | अहमदनगर | ९५० | १८७५ | २८२५ | २६ | अमरावती | ९५० | २३०८ | ३२५८ |
| १० | पुणे | ९५० | १९०० | २८५० | २७ | यवतमाळ | ९५० | २३६० | ३३१० |
| ११ | सोलापूर | ९५० | २०७५ | ३०२५ | २८ | वर्धा | ९५० | २८८५ | ३८३५ |
| १२ | सातारा | ९५० | २१०० | ३०५० | २९ | नागपूर | ९५० | २८८५ | ३८३५ |
| १३ | सांगली | ९५० | २२५० | ३२०० | ३० | भंडारा | ९५० | २९९० | ३९४० |
| १४ | कोल्हापूर | ९५० | २३०३ | ३२५३ | ३१ | गोंदिया | ९५० | ३०९५ | ४०४५ |
| १५ | औरंगाबाद | ९५० | १९४० | २८९० | ३२ | चंद्रपूर | ९५० | ३०९५ | ४०४५ |
| १६ | जालना | ९५० | २२०३ | ३१५३ | ३३ | गडचिरोली | ९५० | ३३०५ | ४२५५ |
| १७ | बीड | ९५० | २१८८ | ३१३८ | | | | | |

कृषि विभागाच्या विविध योजनांतर्गत फॉस्फो जिप्सम पुरवठ्यासाठी कृषि आयुक्तालयातील योजना राबविणाऱ्या संबंधित कक्ष/ विभागाने त्यांच्या स्तरावरुन योजना व त्यातील घटक राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमीत कराव्यात.

योजनांतर्गत जिल्हानिहाय खरेदी करावयाच्या फॉस्फो जिप्समची मागणी, पोहोच करण्याची ठिकाणे, संपर्क अधिकारी/ कर्मचारी व इतर अनुषंगीक माहिती कृषि आयुक्तालयातील योजना राबविणाऱ्या संबंधीत कक्ष/ विभागाने त्यांचे स्तरावरुन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना उपलब्ध करुन द्यावी.

**फॉस्फो जिप्समचा पुरवठा करतांना खालील प्रमाणे दक्षता घेणेत यावी.**

१) फॉस्फो जिप्सम हे सॉइल ॲप्लिकेशनसाठी असून त्याच्या वापराबाबत सर्व संबंधितांना आवश्यक तांत्रीक माहिती देण्याची संपूर्ण दक्षता पुरवठ्याचे आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांनी घ्यावी. पुरवठा करावयाचे फॉस्फो जिप्सम हे खत नियंत्रण आदेश १९८५ मधील मानकानुसार असणे आवश्यक आहे, याची पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी खात्री करुनच पुरवठा करावा तसेच फॉस्फो जिप्सम हे परवानाधारक उत्पादक/पुरवठदार यांचेकडून खरेदी करावी.

२) तालुका स्तरावर विविध योजनांतर्गत फॉस्फो जिप्समचा पुरवठा करण्यांत आलेनंतर तेथील खत निरीक्षकांनी प्रत्यक्ष झालेल्या पुरवठा साठ्यातून फॉस्फो जिप्समचे नमुने काढावेत व शासकीय खत नियंत्रण प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत.

३) तपासणीसाठीची फी खत उत्पादकांनी /पुरवठादारांनी अदा करावी.

४) फॉस्फो जिप्समची तपासणी संबंधित खत नियंत्रण प्रयोगशाळांनी खत नियंत्रण आदेश १९८५ मधील विश्लेषण पद्धतीनुसार विश्लेषण करुन तसा अहवाल संबंधिताना द्यावा.

५) नमुना विश्लेषणानंतर अप्रमाणीत आढळून आल्यास तालुकास्तरावर पुरवठा झालेल्या साठ्याची देयके अदा करु नयेत.

**कृषि संचालक (निवगुनि)**
**कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे-१**

---

जा.क्र.राखते/गुनि-३-४/फॉ.जि.दर/३३३/१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००१, दिनांक : ०५ ऑगस्ट २०१४

**प्रति,**

**१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ, कृषि भवन, दिनकरराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव, मुंबई**

**२. कृषि संचालक (विस्तार व प्रक्षिण) / (फलोत्पादन,) कृषि आयुक्तालय, पुणे-५**

**३. विभागीय कृषि सह संचालक, (सर्व)**

**४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

२/- त्यांनी या परिपत्रकाच्या प्रती अधिनस्त सर्व उपविभागीय कृषि अधिकारी/ तालुका कृषि अधिकारी यांना त्यांच्या स्तरावरुन द्याव्यात.

**५. कृषि विकास अधिकारी (सर्व)**

**६. मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे**

**७. कृषि उपसंचालक (मृसमृचा), कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे.**

**प्रत - मा. प्रधान सचिव, (कृषि) कृषि व पदुम विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.**